# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.02.2025** **वारःसोमवार**

**ठळक बातम्या**

1. परीक्षा पे चर्चा कार्यक्रमांतर्गत पंतप्रधानांची आज विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी बातचीत
2. छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत 31 नक्षलवादी ठार, दोन जवानांनाही वीरमरण
3. बाबा आमटेंच्या आनंदवन प्रकल्पाला दहा कोटींचा निधी देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
4. चौंडी इथल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाला लवकरच राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा मिळणार- विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांची घोषणा

आणि

5. इंग्लंडविरुद्धच्या 50 षटकांच्या क्रिकेट सामन्यात भारताचा 4 गडी राखून विजय

**परीक्षा पे चर्चा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं परीक्षा पे चर्चा या संवादात्मक उपक्रमांतर्गत विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधणार आहेत. यंदा या उपक्रमाचं हे आठवं वर्ष आहे. या कार्यक्रमात पंतप्रधानांशी थेट संवाद साधण्यासाठी सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधून 36 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. परीक्षा पे चर्चा 2025 चं वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये सात भागांचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती विद्यार्थ्यांना जीवनाच्या आणि शिक्षणाच्या विविध पैलूंबाबत मार्गदर्शन करणार आहेत. आकाशवाणी, दूरदर्शनसह पंतप्रधान कार्यालयाच्या यू ट्यूब वाहिनीवरून तसंच शिक्षण आणि माहिती आणि प्रसारण या मंत्रालयांच्या समाज माध्यम वाहिन्यांवरून या कार्यक्रमाचं थेट प्रसारण करण्यात येणार आहे.

**नक्षली चकमक**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात काल सकाळी सुरक्षादलं आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत 31 नक्षलवादी ठार झाले. चकमकीत सुरक्षा दलाच्या दोन कर्मचाऱ्यांचाही मृत्यू झाला असून दोन जवान जखमी झाले आहेत. वीरमरण आलेल्या जवानांपैकी एक राज्य पोलीस दलाचा कर्मचारी असून दुसरा विशेष कृती दलाचा आहे. चकमकीत जखमी झालेल्या दोन जवानांवर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. दरम्यान, चकमक झाली त्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. बिजापूर इथल्या इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसरातील जंगलात सुरक्षा दलानं काल सकाळी शोधमोहिम हाती घेतली होती. ही मोहिम सुरू असताना नक्षलवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. सुरक्षा दलाच्या जवानांनी त्याला चोख प्रत्युत्तर दिलं. यात 31 नक्षलवादी ठार झाल्याची माहिती बस्तरचे पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी दिली. या घटनेसंदर्भात केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी, सुरक्षा दलांनी केलेली ही कामगिरी म्हणजे भारताला नक्षलवादमुक्त करण्याच्या दिशेनं मोठं यश आहे अशी प्रतिक्रिया समाजमाध्यमावरून व्यक्त केली आहे. या संदेशात त्यांनी चकमकीत वीरमरण आलेल्या जवानांच्या कुटुंबियांप्रती त्यांनी सहवेदना व्यक्त केली आहे. देश या दोन वीर जवानांचा सदैव ऋणी राहील, असंही शहा यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**आनंदवन निधी**

दिवंगत बाबा आमटे यांनी सुरू केलेल्या आनंदवन या प्रकल्पाला दहा कोटींचा निधी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केली. आनंदवनातील महारोगी सेवा समितीला पंचाहत्तर वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित कृतज्ञता मित्र मेळाव्यात ते बोलत होते. आज 75 वर्षानंतर अनेक प्रतिष्ठित लोक या संस्थेशी जोडले गेले आहेत. या सर्वांना आनंदवनातून आत्मिक समाधान मिळत असते. त्यामुळेच आनंदवन हे ख-या अर्थाने मानवतेचे मंदीर आहे, अशा भावनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2027 पर्यंत देश कुष्ठरोगमुक्त करण्याचं उद्दीष्ट ठरवलं आहे. आनंदवनसारख्या समाजसेवी संघटनांच्या मदतीनंच हे साध्य करता येईल असं ते म्हणाले. कुष्ठरुग्णांची संख्या लक्षणीयरित्या घटली असली तरी मोठ्या प्रमाणावर अजून कार्य करायचं बाकी आहे असं नमूद करत आनंदवनात पाचशे जणांसाठी निवासी रुग्णकेंद्र उभारण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. रुग्णालयाला देण्यात येणारं अनुदान प्रतिरुग्ण 2200 वरुन 6000 पर्यंत तर पुनर्वसनासाठीच्या अनुदानातही दोन हजारांवरून 6000 पर्यंत वाढ करण्याची घोषणाही फडणवीस यांनी यावेळी केली. राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंतही यावेळी उपस्थित होते. दिव्यांगांसाठी देशातल्या पहिल्यावहिल्या कौशल्य विकास केंद्राची स्थापना आनंदवनात करण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.

**अहिल्यादेवी होळकर**

"चौंडी इथल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली असून स्मारकाचा आराखडा राज्य शासनाला सादर केला आहे. पुढच्या दोन-तीन बैठकांमध्ये त्यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे," असं प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी काल केलं. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दी निमित्त अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या त्यांच्या जन्मगावी काल एका विशेष अभिवादन कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्याच्या अध्यक्ष स्थानावरून शिंदे बोलत होते. लोकमाता अहिल्याबाई होळकर श्री शताब्दी समारोह केंद्रीय समिती आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था यांच्या वतीनं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. कार्यक्रमाला देशाच्या कानाकोपऱ्यातून संशोधक, अभ्यासक, सामाजिक कार्यामध्ये कार्यरत असलेल्या सुमारे पाचशेहून अधिक महिला सहभागी झाल्या होत्या. ऐकूया याबाबतचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून...............

**चौंडी इथं झालेल्या या एकदिवसीय अभिवादन समारंभात मातृत्व, नेतृत्व आणि कर्तृत्व अशा तिनही पातळ्यांवर स्वतःला यशस्वी आणि 100 टक्के सिद्ध करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकण्यात आला. अहिल्यादेवी होळकर यांचं लोककल्याणकारी सुशासन, अहिल्यादेवींचं धार्मिक कार्य आणि राष्ट्रीय दृष्टीकोन, त्यांचं स्थापत्य शास्त्र, सामाजिक सुधारणा आणि अहिल्यादेवींनी केलेलं महिला सक्षमीकरण इत्यादी विषयांचा अभ्यासकांनी यामध्ये उहापोह केला. चिन्मयी मुळे, कॅ. मिरा दवे, डॉ. आदिती नारायणी पासवान, नयना सहस्त्रबुद्धे, चंदाताई भाग्यश्री साठे, स्मिता कुलकर्णी, डॉ. पी.व्ही. शास्त्री इ. मान्यवर त्यामध्ये उपस्थित झाले होते. एरव्ही शालेय अभ्यासक्रमात झालेली अहिल्यादेवींची ओळख लक्षात ठेवून त्यांच्या समग्र कार्यावर दृष्टीक्षेप टाकल्यानंतर त्यांच्या सुशोभित जन्मस्थळाचं दर्शन घेऊन देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शेकडो महिला प्रतिनिधी तिथून मार्गस्थ झाल्या ते मात्र प्रेरणेची नवी ज्योत मनात घेऊन..... आकाशवाणी बातम्यांसाठी चौंडीहून स्वाती महाळंक.**

**सहकार परिषद**

सहकार चळवळीतील संस्था नैतिक मूल्यांच्या आधारावर पारदर्शकपणे चालविल्यास सहकार क्षेत्राची निश्चितच भरभराट होईल, असं प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी काल केलं. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था संघ आणि राज्य शासनाच्या सहकार विभागाच्या संयुक्त विद्यमानं अहिल्यानगर इथं आयोजित 'आंतरराष्ट्रीय सहकार परिषद 2025' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. आजही लोकांचा सहकारावर विश्वास आहे. त्यामुळे सहकार वर्षात काही नवीन उपक्रम हाती घेऊन अडचणीत असलेल्या संस्थांना मार्गदर्शन करणं आवश्यक आहे, असंही बागडे यावेळी म्हणाले.

**नॅशनल गेम्स**

उत्तराखंडमध्ये देहरादून इथं सुरू असलेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या तेजस शिरसे यानं पुरुषांच्या 100 मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावलं आहे. या स्पर्धेमधे महाराष्ट्रानं सर्वाधिक 113 पदकं जिंकली असून पदतालिकेत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर क्रमांकावर आहे.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील मर्यादित 50 षटकांच्या मालिकेतील काल कटक इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं इंग्लंडवर 4 गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात इंग्लंडनं प्रथम फलंदाजी करत भारतापुढे विजयासाठी 305 धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. त्याला प्रत्युत्तर देताना भारतानं 44 षटकं आणि 3 चेंडूत 308 धावा केल्या. भारतातर्फे कर्णधार रोहित शर्मानं 119 धावा केल्या. रोहित शर्माला सामनावीर घोषित करण्यात आलं.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार**.